# ग्रंथालये:परिवर्तनाच्या वाटेवरील क्रांतिदूत

ग्रंथालये हा आपल्या समाजाचा श्वास आहे, ही जाणीव टप्प्याटप्प्यावर मला होत राहिली आहे. लहानपणी माझ्या विक्रोळीच्या उदयाचल शाळेत सुसज्ज ग्रंथालय होते. आमची शाळा आठ तासांची होती, त्यामुळे मधल्या सुट्टीत किंवा वाचनाच्या तासालाच तिथे जाण्याकरिता वेळ मिळायचा. पुढे सोमैया महाविद्यालयातले दोन मजली ग्रंथालय, तिथली आवडती जागा नि पुस्तकांची भरलेली कपाटे यांना माझ्या आयुष्यात फार मोठे स्थान आहे. १९६० सालापासूनच्या या ग्रंथालयात अगणित पुस्तके आहेत. मुक्तपणे कपाटे पाहता येतात, हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य, त्यामुळे हव्या त्या विषयावरची पुस्तके मनसोक्तपणे शोधता येतात. पुढे एम.ए.साठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला.

राजाबाई टॉवरमधील विद्यापीठाच्या ग्रंथालयाची वास्तू अविस्मरणीय आहे. तिथल्या ग्रंथालयात दिवसभर अभ्यास करण्यात अवर्णनीय आनंद असायचा. याच काळात दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची ओळख झाली. वृत्तपत्रीय कात्रणे, मासिके यांचे दुर्मीळ संदर्भ सापडले की, अमाप आनंद व्हायचा. माझ्या डॉक्टरेटच्या अभ्यासात ग्रंथालयांचे योगदान मोठे आहे. या सर्व ग्रंथालयांची आठवण आली, ती ठाणे जिल्ह्यातील ग्रंथालयांच्या अधिवेशनानिमित्ताने. ठाण्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय या अधिवेशनाच्या आयोजकांच्या प्रमुख भूमिकेत होते. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात रंगकर्मी सुहास जोशी यांचे भाषण ऐकले. रंगभूमीविषयक पुस्तकांमुळे होणारे संस्कार किती मोलाची भूमिका बजावतात, हे या भाषणातून त्यांनी सहज उलगडले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रदीप कर्णिक होते. रूपारेलसारख्या प्राथितयश महाविद्यालयाचे ग्रंथपाल, मराठी संशोधनपत्रिकेच्या संशोधनाचा अनुभव नि व्यक्तिमत्त्वाला व्यासंगी अभ्यासकाचे परिमाण यामुळे कर्णिकांचे भाषण ऐकण्याची उत्सुकता होती.

ग्रंथालय सेवकांची उपेक्षा नि त्यांना मिळणारे तुटपुंजे वेतन याकडे कर्णिक यांनी लक्ष वेधले. शासनाच्या प्रस्तावित 'मराठी विद्यापीठा'त ग्रंथालये व ग्रंथालयशास्त्र, तसेच त्याविषयीचे अभ्यासक्रम यांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे हा मुद्दा मांडला. अनेक ग्रंथालयांची आजमितीला दुरवस्था झालेली आहे. धुळीने कपाटे भरली असतील, तर ग्रंथालय सेवकांना त्रास होऊ शकतो म्हणून त्यांनी आपली योग्य काळजी घ्यावी, असे मत साहित्यिक-समीक्षक डॉ. अनंत देशमुख यांनी आवर्जून व्यक्त केले. ग्रंथालये क्रांतीचे दूत बनून समाजात काम करतात. मात्र आपल्या समाजात त्यांचे मोल समजून घेतले जात नाही. वाचक आहेत तिथे ग्रंथालये अपुरी पडतात, तर ग्रंथालये आहेत तिथे वाचक नाही, अशी परिस्थिती आज आहे. कल्पक ग्रंथपाल वाचकांना वाचनाकडे आकृष्ट करतात.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनप्रेम रुजवणाऱ्या अतिशय मेहनती ग्रंथपालाशी नुकतीच माझी भेट झाली. परितोष पवार मुलुंडच्या केळकर महाविद्यालयात कार्यरत आहेत. वाचनकट्टा, बातमीपत्र, ग्रंथालयाची वेबसाइट, विशिष्ट विषयावरील पुस्तकप्रदर्शन, ई - वाचनस्त्रोतांचा उचित उपयोग एक ना दोन असंख्य उपक्रम परितोष राबवत आहेत. एखाद्या विद्यार्थ्याने एखादा विषय त्यांच्यासमोर मांडणे व त्या प्रकल्पाकरिता अनेक संदर्भांचा शोध ग्रंथपालांनी घेणे, हे पवार सर सातत्याने करत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज वाचनासाठी अनेक दिशा उपलब्ध आहेत. परितोष पवारांसारखा ग्रंथपाल याकरिता प्रयत्न करतो. ग्रंथपाल कल्पक नसेल, तर ग्रंथालयाची दुर्दशा होते. त्यामुळे नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या व अद्ययावत समकालीन ज्ञान असणारे ग्रंथपाल ही काळाची गरज आहे.

# माता रमाई महिलांचे प्रेरणा स्थान

**कष्टकरी** महिलांचे प्रेरणा स्थळ कष्टकारी महिला नेहमी आपल्या पतिदेवला सर्वच कामात सतत मदत करीत असतात अशा महिलांचे प्रेरणा स्थान म्हणजे माता रमाई. माता रमाई बाबत आज प्रयन्त अनेक प्रकारचे लिखाण हे भावनिकच झाले आहे. रमाबाईच्या कष्ट त्यागाला भावनिक केल्या गेले आहे.भिमराव आंबेडकर यांना जी साथ मिळाली ती भावनिक कधीच नव्हती ती पतीच्या कर्तव्य दक्षतेला मनापासुन पत्नीची साथ होती.ती प्रेरणा खेडया पड्यातील व शहरातील झोपड्पट्टीत राहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पत्नीनी घेतली म्हणुन ते आंबेडकर चळवळीतील प्रत्येक जनआंदोलनात पति पत्नी सहभागी होतात.विशेष ते सर्वच असंघटित कामगार असतात.पण असंघटित कामगार म्हणुन ते कोणतेही आंदोलन करीत नाही.त्याची त्यांना जाणीव नाही.रमाबाई आणि भिमरावचे सर्व नातलग कोणते कामगार होते?.

रमाबाई बदल जेवढा आदर अडानी असंघटित महिला पळतात तेवढा सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या आणि सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या महिला पाळत नाही. अशा महिला आपल्या पतीला बिनपगारी कोणतेही काम करू देत नाही.(देत असतील अशा त्या महिलांचे हार्दिक अभिनंदन आणि माफी मांगुन )आज प्रयन्तचा इतिहास आणि अनुभवा वरुन हे लिहतो.अन्यता आंबेडकर चळवळीत आज जी लेटरहेड वर जागणाऱ्याची जी संख्या आहे .ती राहली नसती.प्रत्येक यशस्वी पुरुषा मागे एका महिलाचा हात असतो तसाच एका अपयशस्वी पुरुषा मागे एका महिलांचा हात असतो.मग घराघरत असलेल्या आंबेडकर चळवळीतील गटागटच्या नेत्यांच्या महिलाचे प्रेरणा स्थान कोणते?.

रमाबाई ह्या बाबासाहेब याच्या प्रत्येक आंदोलनात मनाने सहभागी होत्या पण शरीराने नाही. मुलगा आजारी आहे घरात पैसा अदला नाही. नवरा तिकडे समाजसेवा करतो. असे सहन करणारी महिला आज शोधून सापडणार नाही. त्या आजारात मुलगा मरण पावतो तरी ती महिला विचलीत होवुन नवरया बदल राई चा पर्वत बनवित नाही. परिस्थिती समजुन घेते.या ला भावनिक



मुद्दा कसा म्हणता येईल?. हा समंजस पणा, दूरदृष्टिपणा होता. त्याला दुरदुष्टी म्हणता येईल.हा मंत्र आज महिलांनी घेणे गरजेचा आहे. आज समाज ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत त्याचे (बाबासाहेबाचे) कुटुंब आहे.त्याकाळी बाबासाहेब आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलावी यासाठी शिकत नव्हते तर समाजाची एकूण सर्व परिस्थिती बदलण्या करीता शिकत होते.हे माता रमाबाई समजू शकत होती. आजची एकही माता असा विचार करणारी दिसणार नाही. महाउपासीका मिराताई पण नाही. अन्यथा आनंदराज यांनी मिराताई व बाळासाहेब यांना डावळून किंवा मार्गदर्शन न घेता इंदुमिल स्मारक आंदोलन उभे केलेच नसते. कारण त्याची (आंदोलनाची) प्रेरणा कॉंग्रेस होती. रमाबाई वर असे प्रसंग किती वेळा आले.संपूर्ण देश बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात होता.गांधी पुण्याला उपोषणाला बसले तेव्हा ते त्यात मरणार. त्याचा संपूर्ण राग माझ्या समाजावर निघणार याची कल्पना बाबासाहेब यांना होती.पण रमाबाई ची मानसिक परिस्थिती काय असेल. घरात आणि बाहेर होणाऱ्या चर्चा पेपरात येणारया बातम्या रमाबाईला अस्वस्थ करीत होत्या.काय वर्णन करून ठेवले आल्या थोर विचारवंतांनी?.

रमाबाई ची रमाई कशी झाली किती लोकांना माहित आहे. बाबासाहेब शिक्षणा करिता आणि समाजाला मान सन्मान मिळवून देण्या करिता सतत ब्रिटिशांच्या बरोबर पत्रव्यवहार आणि गाठी भेटी घेत असत. असे एकदा राजगृहावर बाबासाहेब व रमाबाई राहत असताना त्यांना अचानक परदेशी महत्वाच्या कामानिमित्य जायचे होते. पण रमाबाईला एकटे सोडून कसे जाणार हा प्रश्न पडला होता.तेव्हा बाबासाहेबांनी आपल्या एक मित्र धारवाडच्या वराळे काका कडे रमाबाईला पाठवितात. धारवाडचे वराळे काका मुलाचे वसतिगृह चालवीत होते त्याच्या आवारात नेहमी लहान मुले खेळायला येत असत. रमाबाईला दोनचार दिवसात मुलांचा लळा लागला. नेमके तीन दिवसा नंतर आवारात मुलाची किलबिलाट दिसली नाही. वराळे काका चिंतेत दिसतात. म्हणून रमाबाई काका ना विचारतात मुले दोन दिवसात आवारात खेळताना दिसत नाही. कुठे गेली का?. तेव्हा वराळे काका सांगतात दोन दिवस झाले मुले उपाशी आहेत त्यामुळे मुले खेळायला आले नाही. कारण अन्न धान्याचे ग्ल्यांड महिन्याला भेटत असायचे ते अजून मिळाले नाही.ते मिळाल्याला तीन दिवस लागतील. त्यामुळे मुलेही तीन दिवस उपाशी राहतील. वराळे काका अगदी कंठ दाटून ते सांगत होते. त्यामुळे रमाबाई घरात आपल्या खोलीत जातात थोड्या रडत बसतात. नंतर कापटातील डबा काढतात त्यातील सोन आणि सोन्याच्या हातात्तील बांगड्या काढून वरालेच्या हातात देतात.विका किंवा गहान ठेवून ह्या मुलाच्या जेवणाचा बंदोबस्थ करा. त्या नंतर मुले पोटभर जेवतात आणि खूप आनंदात राहतात. हे पाहून रमाबाई खूप आनंदी होतात. त्यामुळे सर्व मुले रमाबाईला रमाआई रमाई म्हणून बोलायला लागतात. वराळे काकाच्या त्या वेळे असून सर्वच लोक रामाबिला रमाई झाल्या.

रमाबाईचे पतीनिष्ठ उदाहरण द्रुष्टी समोर ठेवून बाबासाहेब नेहमी जाहीरपणे सांगत असत. स्त्री हा समाजाचा अलंकार आहे.आपल्या कुटुंबाचे आणि कुळाचा नांव लैकिक स्त्रियाच्या शिलावरच अवलबून असतो. स्त्री हि जशी गृहिणी तशी सुसंस्कारित समाज निर्माण करणारी माता हि असते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैवाहिक जीवनात सुरवात पासून शेवट प्रयन्त रमाबाई नी हाल अपेष्ट, दुख गरिबी याच्याशी सतत संघर्ष करीत राहिल्या त्यामुळे त्या नेहमी आजारी राहत होत्या पण त्यांनी बाबासाहेबाकडे तक्रार केली नाही अशा माता रमाई च्या १२६ व्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला व विचारांना कोटी कोटी प्रणाम आणि सर्व मातांना हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद !!!.

## माता रमाई जयंतीनिमित्त आज संभाजीनगरातील कॅनॉट प्लेसमध्ये 'रमाई पहाट'

### महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांचे सुरेल सादरीकरण

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील नामवंत कलावंतांच्या वतीने बुधवारी (७ फेब्रुवारी) छत्रपती संभाजीनगरातील सिडको येथील कॅनॉट प्लेस येथे रमाई पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात ज्वाजल्य सांस्कृतिक कार्यक्रमातून माता रमाई यांना संगीतम अभिवादन करण्यात येणार आहे.

सकाळी ६ ते ११ वाजेदरम्यान होणाऱ्या अभिवादनपर कार्यक्रमात गायन, सुरवादन, कविता, ढोलपथक, लेझीम, हलगी वादन, फ्रेश मॉब, डान्स, रॅप तथा डीजे आदी कलाप्रकार सादर करण्यात येणार आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील ख्यातनाम आंबेडकरी गायक अजय देहाडे, चेतन चोपडे, कुणाल वराळे, रागिणी प्रतापसिंह बोदडे, भाग्यश्री इंगळे, सचिन भुईगळ, विजय पवार, कवी-गीतकार अमोल कदम, धम्मा धनवे, सुप्रसिद्ध युवा कीर्तनकार अविनाश भारती, निवेदक तथा मिमिक्री आर्टिस्ट सद्दाम शेख, धम्मनाद ढोल पथक मृणाल गजभिये, नागपूरचे फॅश मॉब ग्रुप अयुब डान्स अकॅडमी, ताल माधुर्य संगीत अकादमीचे विक्रम पवार, मुंबईचा मराठी हिपहॉप रॅपर ग्रुप, एच. के. स्टाईल डीजे तथा सुप्रसिद्ध अँकर मीनाक्षी बालकमल आदी कलावंत त्यांच्या कलेच्या सादरीकरण करून माता रमाईस अभिवादन करणार आहेत. या कार्यक्रमास संभाजीनगर शहरातील परिवर्तनावादी-बहुजन नागरिकांसह बौद्ध उपासक, उपासिका आणि भीम अनुयायांनी मोठ्या संख्यने उपस्थित राहून माता रमाईस अभिवादन करण्याचे आवाहन विजय वाहुळ, सचिन भुईगळ, अजय देहाडे, कुणाल वराळे, चेतन चोपडे, अक्षय जाधव, संदीप वाहुळ यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी केले आहे.

# आणि रमा रमाई झाली....

**आई** हा शब्द जगात सगळ्यात व्यापक आणि खूप मोठा आहे. एका बाळाची आई होणं सोपं असतं.पण सर्वांची,समाजाची आई व्हायला तिच्या विचारांची उंची,विचारांची व्यापकता देखील तेवढीच असावी लागते.आणि त्यासाठी खूप त्याग असावा लागतो. विचारांची तितकीच उंचीही असावी लागते.अशीच विचारांची उंची गाठलेली आपली सर्वांची आई.आई रमाई.रमाई म्हणजे अनेक दुःखांची साक्षीदार.दुःख सोसण्याचं बळ आहे म्हणून काय चारही बाजूंनी दुःखांचाच मारा व्हावा? त्याला काही अंत असावा की नको? पण काळ काही लोकांची परीक्षा घेत असावा.आई रमाईची काळानं अशीच परीक्षा घेतली.वणंदगाव नावाच्या छोट्या खेड्यात दाभोळजवळ तिचा जन्म झाला. तिचं पाळण्यातील नाव' भागीरथी' होतं. तिची आई तिला लाडाने भागू म्हणायची.तीन मुली एक भाऊ. त्यात रमाई दुसऱ्या क्रमांकाची.मोठीचं आकाबाईचं लग्न झालेलं.ती सासरी गेलेली.रमाई नंतर गौरी आणि शंकर ही तीन बहिण भाऊ.घरी प्रचंड दारिद्र्य.आणि आता रमाईच्या लग्नाचाही ही खर्च आई-वडिलांवर येऊन ठेपला होता. त्यात घराची पडझड झाली.एक सावरायला गेलं तर दुसरा पसार झाला.सुखदुःखांची लपाछपी चालली होती.तरीही रमाईचे आई वडील रुक्मिणी आणि भिकू एकमेकांना धीर देत राहिले. अपार कष्ट करून त्यांनी रमाईला सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला. ते सगळं दिसत होतं.त्या कोवळ्या वयातही तिची समजशक्ती प्रचंड होती.रुक्मिणी आणि भिकू जिवाची पर्वा न करता अपार कष्ट घेत राहिले.प्रचंड कष्टाने रुक्मिणी फार खंगून गेली होती.त्यातच ती आजारी पडली.तिने खाट धरली.कदाचित कधीही बरी न होण्यासाठी! अनेक गावगाड्यातील उपचार झाले.पण रुक्मिणी उपचाराला प्रतिसाद देत नव्हती.तिची प्रकृती खूप गंभीर झाली.शेजारीपाजारी सगेसोयरे येऊन तिला भेट देत होते.धीर देत होते. पण ते निरर्थक झाले.त्या आजाराने घात केला.आणि रमाई आई विना भिकारी झाली.रुक्मिणीच्या मृत्यूनंतर भिकूवर मोठाच पहाड कोसळला. रमाईला ते दुःख समजत होतं. भिकू तर अगदीच लुळा पांगळा झालाय.गौरी आणि शंकर वयाने लहान असल्याने त्यांना फार काही कळत नव्हतं.अत्यल्प वयात रमाईला गौरी आणि शंकर साठी आईची ही भूमिका पार पाडवी लागणार होती.आणि ती भूमिका रमाईला पार पाडतच होती.अगदी काही दिवस गेले आणि वडील भिकूही कमालीचा खंगुन गेला.भिकूचं काम दाभोळ जवळच्या बंदरावर मासे भरलेले जड टोपले तो उचलत असे.त्यामुळे त्याचा भार छातीवर येऊन पडत असे .रुखमाच्या मृत्यूने तो अधिकच काम करू लागला.तीन मुलं सांभाळण्याची जबाबदारी भिकू वर कुटुंबप्रमुख म्हणून येऊन पडली होती.आणि त्याला छातीच्या दुखण्याचा आजार होता.त्याने रक्ताच्या उलट्याही केल्या होत्या.आजाराचं निदान न झाल्याने आणि रुखमाच्या मृत्यूने तो पार कोलमडून गेला होता.त्यातून त्याला सावरता आलं नाही .त्याच्या आयुष्याचा तोल डगमगायला लागला होता.त्या आजारातून कायमची मुक्ती मिळाली . भिकु जगात राहिला नाही ही बातमी वाऱ्यासारखी पसरली.गाव गोळा झाला.सगेसोयरे वगैरे पुन्हा एकत्र आले.रमाई गौरा आणि शंकर अगदीच पोरके झाले बापाच्या प्रेमाचं छत्रही आता उडालं होतं. कोवळ्या रमाईच्या मनावर मोठाच आघात झाला. वणंदगावात आता जीव लावणारी आणि भविष्य उभे करणारी माणसं राहिली नाही.रमाईच्या काका आणि मामांनी पुढाकार घेतला. ह्या चिमण्या पाखरांना सांभाळण्याची जबाबदारी अंगा खांद्यावर घेतली. वणंदगाव सोडण्याची वेळ आली. आणि मुंबईच्या दिशेने आयुष्याचा प्रवास सुरू झाला. भायखळात रमाई रमू लागली आणि ती नऊ वर्षांची झाली.हे लग्नाचं वय होतं. रामजी सुभेदारांचा मुलगाही म्हणजे बाबासाहेबही लग्नाचे झाले होते. रमाई सुंदर गोरी पान होती. तसे बाबासाहेबही सुंदर दणकट काठीचे होते. ते शिकत होते.

आणि शेवटी रमाई बाबासाहेबांशी विवाहबद्ध झाली.इथे तिला थोडं बरं वाटू लागलं. सर्व तिच्यावर जीवापाड प्रेम करायचे. जीव लावायचे.रामजी सुभेदार वडिलांप्रमाणे प्रेम करायचे.पण हे फार काळ सुख वाट्याला आलं नाही.रामजीचा ही मृत्यू झाला.आणि पुन्हा रमा एका अर्थाने वडिलांच्या प्रेमाला मुकली.बाबासाहेब शिकत असताना तिची बरीच ओढाताण झाली.रमाईने एक एक मुलांचा मृत्यू पाहिला.पोटचा गोळा अखेरचा श्वास घेत होता.आणि रमाई हद्बलपणे बघत होती...

बाबासाहेबांनी फुलेंचं उदाहरण देत शिक्षणाचे महत्त्व रमाईला पटवून दिलं आणि साक्षर केलं.त्या शिक्षणाचा फायदा झाला .बाबासाहेबांनी कोलंबियावरून रमाईला पत्र लिहिलं.रमाईला आलेलं ते पहिलंच पत्र होतं.त्या पत्राने ती खूप आनंदी होऊन गेली. बाबासाहेबांच्या शिक्षणाचे महत्त्व ती जाणून होती.बाबासाहेबांचे हाल हवाल तिला पत्रातून कळाले होते.आपल्या देशातील स्पृश्य अस्पृश्य आधारावर केलेला भेदभाव आणि प्रदेशातील माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य त्यातील मोकळा श्वास घेणारी माणसं याविषयी बाबासाहेबांनी पत्रात लिहिलं होतं.आणखीही बरंच काही पत्रातून रमाईला कळालं होतं. रमाईला खूप आनंद झाला होता.यशवंत त्यावेळी छोटा होता. रमाईने देखील बाबासाहेबांच्या पत्राला उत्तर दिलं.पत्रातून तिला झालेला आनंद तिने व्यक्त केला होता सुखाच्या गोष्टी जशा रमाईने मांडल्या होत्या तसेच काही पत्र रमाईने दुःखाने ओथंबलेलेही लिहिले होते. बाबासाहेब अमेरिकेला गेल्यानंतर मुलगा जन्माला आला होता. त्याचं नाव होतं.रमेशचा वर्षाच्या आताच मृत्यू झाला.रमेश च्या मृत्यूची बातमी ही तिने बाबासाहेबांना पत्रानेच कळविली होती. बाबासाहेबांची ईंदू ही मुलगी ही मरण पावली.गंगाधरच्या आजाराविषयी देखील रमाईने पत्र लिहिलं होतं उपचाराविना गेलेली मुलं आणि त्यासाठीचा पश्चाताप बाबासाहेब आणि रमाईला झाला होता. दुःखाने रमाईचा शरीर पार पोखरून निघाला होता. बाबासाहेब विषयी तिला मोठी चिंता वाटत असे.ती देवभोळी. होती उपास तपास देवधर्म यावर तिचा विश्वास होता. पंढरपूरच्या पांडुरंगावर तिचा खूप विश्वास होता. चोकोबाच्या बायकोचा बाळंतपण विठोबाने केलं जनाईचा दडणकांडण त्याने केलं असं ऐकून होती.आपण पंढरपूरला जावं. दर्शन घ्यावं.असं तिला वाटायचं. तिने बाबासाहेबांकडे आपला एक खडा टाकून पाहिला.आणि बाबासाहेब कडाडले,म्हणाले,' खालच्या जातीच्या लोकांना पंढरपूरचा पांडुरंग दर्शन देत नाही.सातशे वर्षांपूर्वी ते चोकोबालाही घेता आलं नाही.

जो देव भक्तांना दर्शन देत नाही त्या देवाकडे कशाला जायचं? जो देव पंड्यांचं ऐकतो आणि प्रांजळ भक्तांना जवळ येऊ देत नाही तो देऊ काय कामाचा ? काय करायचं आहे पंढरपूरचं? रमाईला वाईट वाटलं पण बाबासाहेबांनी तिला सांगितलं, समजावलं. 'तू पंढरपुरातून डोकं काढून टाक आणि डोक्यातून पंढरपूर काढून टाक' बाबासाहेब म्हणतात,रामू आपल्याला आपल्या त्यागाने गोरगरिबांच्या सेवेनं आपला दुसरा पंढरपूर उभा करू. तिथे लोक भक्तीसाठी नाही तर क्रांतीसाठी येतील. आणि रमाईला बाबासाहेबांचं म्हणणं पटलं.पुढे रमाईनं कधिही बाबासाहेबांच्या विचारांची सोबत राहायचं ठरवलं. रमाईने अतिशय खडतर आयुष्यात बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावला आणिध लढा दिला.आणि रमा खऱ्या अर्थाने रमाई,रमाआई झाली.

**- राजू बोरकर**
७५०७०२५४६७
मु.पो.ता.लाखांदूर,जि.भंडारा.

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री द्वय तसेच वरिष्ठ सचिवांच्या उपस्थितीत ७ फेब्रुवारी रोजी अधिकारी महासंघाचा ३८ वा वर्धापन दिन

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - दि. ७ फेब्रुवारी, १९८६ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचा दि. ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी ३८ वा वर्धापन दिन थाटामाटात साजरा होत आहे.

या सोहळ्याला मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस; उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री ना. अजितदादा पवार; महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील हे मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार असून, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, अपर मुख्यसचिव (सेवा) श्री. नितीन गद्रे, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (साविस) श्री. सुमंत भांगे, तसेच कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, मुंबई उपनगरचे विद्यमान जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र क्षीरसागर, यापूर्वीचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम दि. ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ठिक ३.०० वा. शासनाच्या मार्गदर्शन व सहकार्याने उभारले जात असलेल्या, बांद्रा (पूर्व) येथील महासंघाच्या कल्याणकेंद्राच्या ठिकाणी होणार आहे.

महासंघाचा वर्धापन दिन हा राज्यातील सर्व अधिकाऱ्यांसाठी एक आनंद सोहळाच असतो. या कार्यक्रमाला महासंघाचे राज्यभरातील पदाधिकारी; संलग्न सर्व खाते संघटना तसेच जिल्हा समन्वय समित्यांचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या निमित्ताने अधिकारी महासंघाच्या वतीने, सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करणे; केंद्र व अन्य २५ राज्यांप्रमाणे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे; सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरणे; वेतनश्रेण्यांमधील अन्याय दूर करणे; शासकीय अधिकाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या मारहाण -दमबाजीसंदर्भातील भा.दं. वि. कलम ३५३ मध्ये बदल करु नये; सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमधील केंद्राप्रमाणे रु. ५४०० ग्रेड पे ची मर्यादा रद्द करावी, आदी जिव्हाळ्याच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन-प्रशासन प्रमुखांचे प्रकर्षाने लक्ष वेधण्यात येणार आहे.

ग.दि. कुलथे (मुख्य सल्लागार), विनोद देसाई (अध्यक्ष), समीर भाटकर (सरचिटणीस), नितीन काळे (कोषाध्यक्ष), डॉ. रत्नाकर पेडगावकर (उपाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर विभाग)

# अनाधिकृत मोबाईल टॉवरचे काम थांबवले

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत जटवाडा रोड होनाजी नगर भागातील अनधिकृत मोबाईल टॉवरचे काम बंद करण्यात आले आहे. अतिक्रमण हटाव विभागा मार्फत आज प्रभाग क्रमांक चार परिसरातील जटवाडा रोड येथील होनाजी नगर या ठिकाणी सांडू यादव बकले यांच्या घरावर अनधिकृतपणे मोबाईल टावर उभारणीचे काम सुरू असल्याची माहिती समजली असता मा. पद निर्देशित अधिकारी अशोक गिरी यांच्यासमवेत प्रथम त्या भागाची पाहणी करण्यात आली. पाहणी करून त्या टॉवर उभारणी संबंधित परवानगी आहे किंवा नाही याची खात्री करून दुपारी एक वाजता या इमारतीवर छापा टाकून टॉवरचे साहित्य जप्त करण्यात आले. सदर टॉवर हे इंडस कंपनीचे असल्याचे समजले.

याबाबत घर मालकाशिवाय कोणीही आतापर्यंत समोर आला नाही इंडस किंवा इतर टॉवर कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा फोन लावला असता कोणी फोनवर प्रतिसाद दिला नाही. सध्या टॉवर चे साहित्य जप्त करण्यात आले असून घरमालकास नोटीस देण्यात आली आहे. विनापरवानगी आपण मोबाईल टॉवर उभारू नये नसता आपल्या विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल असे तोंडी कळविण्यात आले आहे.सदर ठिकाणांहून दोन लोखंडी पट्टूया सह टॉवर उभारणीचे स्टीलचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

पंधरा बाय दहा आकाराचे आरसीसी कॉलम उभारून त्याच्यावर हे टॉवर उभारणीचे काम सुरू होते.सदर ठिकाणी पंचनामा करण्यात येऊन काम बंद करण्यात आले आहे.

यानंतर याच पथकाने सिडको उड्डाणपूल पासून ते मुकुंदवाडी मुकुंदवाडी पासून पुढे विमानतळापर्यंत अपघातास निमंत्रण देणाऱ्या चार हातगाडी फळ विक्रेते विरुद्ध कारवाई करण्यात आली.

सदर फळ विक्रेते हॉटेल औरंगाबाद जिमखानाच्या पुढे धूत हॉस्पिटलच्या लगत व पुढे विमानतळाच्या समोर मेन रोडवर धोकादायक पद्धतीने उभा राहून फळ विक्रीचे व्यवसाय करत असल्याने याबाबत वेळोवेळी पेट्रोलिंग करून त्यांची शूटिंग फोटो काढून त्यांना सक्त टाकीद देऊनही ते जुमानत नसल्याने त्यांचे हातगाड्या जप्त करण्यात आल्या.

याबाबत वरिष्ठांची परवानगी घेऊन गोपनीयता पाळण्यात आली साध्या वेशात मजूर उभे केले व मजूर उभे केल्यानंतर लगेच त्या ठिकाणी गाडी पाठविली आणि सदर लोकाविरुद्ध कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, उप आयुक्त मंगेश देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली झोन क्रमांक चार चे पद निर्देशित अधिकारी अशोक गिरी व झोन क्रमांक पाच चे पद निर्देशित अधिकारी सविता सोनवणे , माजी सैनिक व मनपा मजूर यांच्या समवेत पार पाडण्यात आली.अशी माहिती अतिक्रमण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# आजी -आजोबाना कुटुंबात स्थान द्या;मुलं-मुली वळणावर येतील



वैजापूर, दि. ६ (प्रतिर्निधी) - आज कुटुंबात रामायण व महाभारताच्या नीती व मानवी मूल्ये सांगणाऱ्या आजी आजोबाना स्थान नाही, नीती व तत्वाच्या गोष्टी सांगायला आई बाबांना वेळ नाही. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रतापसिंह यांच्या विरत्वाच्या गोष्टी ही कुणी सांगणारे कुटुंबात नाहीत, आजी -आजोबाना वृद्धाश्रमात स्थान देण्यात आले म्हणून आजची मुले-मुली कुटुंबापासून दुरावत आहेत. मोबाईल संस्कृतीने जीवनाची वाट चुकत आहेत आजी -आजोबांना कुटुंबात स्थान द्या.

त्यांच्या सुसंस्कार उपदेशाने वाट चुकत असलेले मुलं-मुली वळणावर येतील असे उदगार सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी पालक मेळाव्यात केले,येथील विद्याधन इंग्लिश माध्यमाच्या शाळेत नुकताच पालक शिक्षक व संस्था चालक मेळावा सम्पन्न झाला त्या प्रसंगी राजपूत पालकांशी संवाद साधताना बोलत होते, आजी-आजोबांची कुटुंबातील उपस्थिती म्हणजे संस्कार, संस्कृतीची उपस्थिती आहे, हे कदापिही विसरू नये, आजच्या आई-बाबांना वेळ नाही. मुलं शाळेत जातात का? अभ्यास करतात का? गृहपाठ व अभ्यास करतात का याची शाळेत जाऊन साधी चौकशी करायला आई, बाबांना वेळ नाही, आई बाबांच्या कमालीच्या दुर्लक्ष मुळे मुलं-मुली चुकत आहेत हे ध्यानी मनी घेण्याची आजच वेळ आहे, उद्या खूप उशीर झालेला असेल असेही उपस्थित पालकांना संबोधित करताना राजपूत पुढे म्हणाले.

याप्रसंगी संस्था चालक सौ. आशा गायके, दिगंबर गायके, मुख्याध्यापिका सौ, भारती पाटील व शिक्षक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री गायके यांनीही पालकांना काय समस्या असतील त्या शाळेत येऊन शिक्षक व चालक यांना सांगाव्यात असे आवाहन केले.

# वैजापूर पालिकेच्या पीएमश्री नगर परिषद मौलाना आझाद विद्यालयाने 'हॅकथॉन स्पर्धा' जिंकली

वैजापूर, दि. ६ (प्रातिनिधी) - येथील पालिकेच्या पीएमश्री नगर परिषद मौलाना आझाद विद्यालयातील इयत्ता ८वी चे विद्यार्थी अनुक्रमे साई वैभव काळे, हर्ष दिवेकर, तुषार शेलार यांनी जिल्ह्यातील २००शाळा व ५६०४ विद्यार्थी यांच्याशी कॉम्पुटर कोडिंग नावाची 'हॅकथॉन स्पर्धा' नुकतीच खेळून जिल्ह्यात पहिला क्रमांक व पहिले बक्षीस रुपये पांच हजार रोख, एक एलईडी, व संगणक साहित्य जिंकले, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था ,व आंतरराष्ट्रीय पातळीवरील ऑमेझॉन संस्थ्या तसेच जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा औरंगाबाद येथे घेण्यात आली. या विद्यालयाच्या तंत्रस्नेही आदर्श शिक्षिका सुवर्णा बोर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली वरील विद्यार्थ्यांनी खूप परिश्रम घेऊन कचऱ्याचे विलगिकरण व विघटन हा विषय प्रात्यक्षिक कृतीसह कॉम्पुटर कोडिंग द्वारे सादर करून या स्पर्धेत यश संपादन केले, सदरील स्पर्धा औरंगाबाद येथे सम्पन्न झाली. या तंत्रस्नेही शिक्षिका सुवर्णा बोर्डे व वरील विद्यार्थ्यांचा गौरव व सत्कार माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते शनिवार(ता०३)रोजी या शाळेतील विशेष कार्यक्रमात करण्यात आला. मुख्याध्यापिका नीता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पर्यवेक्षक एम.आर. गणवीर, से.नि. मुख्याध्यापक जी.जी. राजपूत होते. यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. त्यांनी ही विजयी स्पर्धकांना अधिक तांत्रिक व अद्यावत ज्ञान शिक्षकांनी प्राप्त करून द्यावे, असे विशद केले. श्री राजपूत यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकी माहिती व पुस्तकी ज्ञानासोबत वैज्ञानिक भौगोलिक तांत्रिकी व गणितीय ज्ञान व माहिती देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. सूत्र संचालन बी.बी. जाधव यांनी केले. राजश्री बंड यांनी आभार मानले, या प्रसंगी मुख्याध्यापिका नीता पाटील, शिक्षिका ज्योती दिवेकर, वैशाली पगारे, लता सुखासे, सुनीता वसावे, जयश्री बंड, संदीप शेळके, सुभाष गोमलाडू, श्री. रावकर, श्री. राठोड यांनी सहभाग नोंदविला.

# सावित्री कंट्रोल रूम अधिकाऱ्यांची किराडपुरा शाळेस भेट व मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत, उप आयुक्त नंदा गायकवाड आणि सांगळे सर यांचा मार्गदर्शनाखाली आज दि.०२ फेब्रुवारी रोजी सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूमतर्फे समुपदेशक साकिब शेख, मनीषा सुरडकर, भिमा हिवराळे व सारिका थोरात,यांनी किराडपुरा न.१ उर्दू शाळेला भेट दिली.

शाळेचे मुख्यध्यापिका खान रईसा यांचाशी भेट घेतली व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्याशी संवाद साधला. शाळेतील मुख्यध्यापिका रईसा मॅडम यांचा सोबत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना भेटून त्यांच्यासोबत चर्चा केली. जे विद्यार्थी शाळेत नियमित गैरहजर असतात त्याचे कारण जाणून समुपदेशन केले व विद्यार्थ्यांना दररोज शाळेत येण्यासाठी प्रवृत्त केले तसेच सावित्री कंट्रोल रूम मधून शाळेचा शिक्षक - शिक्षिकाना विद्यार्थ्या संबंधी जाणारे फोन व स्मार्ट गुरु ॲपमुळे हे शक्य झाले आहे.

स्मार्ट गुरु ॲपची निर्मिती करणारे संस्थापक सत्यम आव्हाड आणि सचिन गुट्टे यांनी यांचा हाती हा उपक्रम छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सर्व शाळा मधे राबवलेला आहे. या उपक्रमाचा खूप चांगल्या प्रकारे शाळांना फायदा होत आहे. या प्रकल्पाचा कौतुक आणि प्रशंसा दिल्ली सह देश पातळीवर होत आहे. हे शक्य झाले आहे फक्त आणि फक्त मा. आयुक्त जी. श्रीकांत साहेब मुळे आणि त्यांनी सुचवलेले प्रकल्प म्हणजे स्मार्ट गुरु ॲपमुळे.

स्मार्ट गुरु ॲप मुळेच किराडपुरा न.१ उर्दू या शाळेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

मु.रईसा मॅडम यांचे व सावित्री कंट्रोल रूम यांचा मार्गदर्शनाखाली विद्यार्थी यांचे वेळेवर हजेरी भरणे, त्यांचे निकाल वेळेवर लावणे, विद्यार्थी- विद्यार्थिनी हे जर ३ दिवस, ७ दिवस, १५ दिवस आणि ३० दिवस गैर हजर असतील तर त्यांचा पालकांना फोन वर संभाषण करून त्यांना शाळेत येण्यास प्रवृत करणे तसेच शाळेत न येणाऱ्या विद्यार्थियांच्या घरी भेटी देणे हे सावित्री कंट्रोल रूम मुळे त्यांना तंतोतंत विद्यार्थी यांची माहिती मिळाली यात सर्व शिक्षक- शिक्षिका यांनी घेतलेली मेहनत खूप प्रशंसीय आहे याची खूप प्रशंसा केली व त्यांचे आभार मानले. तसेच शाळेतील सोयी-सुविधा व शिक्षकांना येणाऱ्या अडचणी जाणवून घेतल्या तसेच मु.रईसा मॅडम व साकिब शेख यांनी मार्गदर्शन केलं आणि सह-शिक्षिका यांनी आभार व्यक्त केले.

# श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्यानिमीत्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - शहरापासुन १२ कि.मी.अंतराव असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक ०९ फेब्रुवारी २०२४ शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येणार आहे.

सर्व उपस्थित समाज बांधवांना ११ ते २ दरम्यान रमणलाल शिखरचंद नंदलाल विजयकुमार महावीर मनोज कासलीवाल परिवार अंबेलोहळ वाला कुवारफल्ली राजाबजार यांच्या वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे.

०९ फेब्रुवारी २०२४ शुक्रवार रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा होवुन सायंकाळी भगवंताची आरतीही करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष विनीत लोहाडे व महामंत्री प्रमोद पांडे यांनी केले आहे.

श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी भाविकांकडून महाप्रसादाचेही आयोजन केले जाते. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी पत्रकाव्दारे दिली आहे.

# पाळीव जनावरांसाठी नवीन उपचार सेवांचा प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या वतीने पाळीव प्राण्यांपासून होणाऱ्या रेबीज सारख्या जीवघेण्या आजारापासून रोखण्यासाठी मनपा पशुचिकित्सालयात उपचारासाठी येणाऱ्या श्वान व मांजर यांचे लसीकरण शस्त्रक्रिया या नवीन उपचार सेवांचा प्रारंभ करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार प्रशासकीय ठराव क्रं.११९५/२०२४ दि.०१/०२/२०२४ अनुसार नवीन उपचार सेवा व त्यांचे दर पुढील प्रमाणे.

०१.केस पेपर - २५-/

०२.सामान्य प्रथमोपचार - १००/-

०३. ए.आर.व्ही.(रेबीज प्रतिबंधक लसीकरण) - १२०/-

०४.सलाईन द्वारे उपचार -१००/-

०५.श्वान निर्बीजीकरण शस्त्र क्रिया (मनपा मार्फत) -११००

०६.मांजर निर्बीजीकरण शस्त्र क्रिया (मनपा मार्फत)- १३५०/- या सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य उद्यान अधिकारी तथा विभाग प्रमुख विजय पाटील व प्रभारी पशू वैद्यकीय अधिकारी शेख शाहेद यांनी केले आहे.

# विद्युत कॉलनी येथील ३९ अनाधिकृत नळ खंडित

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अनधिकृत नळ जोडणी शोध पथक प्रमुख तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे यांच्या अधिपत्त्याखाली झोन क्रं. १ च्या ईब्राहीम शहा कॉलनी व विद्युत कॉलनी या भागात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके च्या १५० मिमी जलवाहिनी वरील एकूण ३९ अनधिकृत नळ खंडित करण्यात आले.

सदर ठिकाणी नवीन पुई जलवाहिनी टाकण्यात येत असल्याने येथील जुन्या जलवाहिनी वरील सर्व अनधिकृत नळ खांडित करण्यात आले.

ज्या नागरिकांचे नळ सध्या अनधिकृत आहेत असे नळ 'महा अभय' योजने अंतर्गत अधिकृत करुन घेण्यात येतील आणि त्या नंतरच त्यांना नवीन HDPE जलवाहिनी वर अधिकृतपणे कंपनी द्वारे रीतसर नळ जोडण्या करून देण्यात येतील.शहरातील अनेक

ठिकाणी अश्या नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम चालू असल्याने पथक निरीक्षण करून अनधिकृत नळ खंडित करण्याची कारवाही चालू राहणार आहे.

सोबत सातत्याने पथकाला प्राप्त होणाऱ्या तक्रारींमुळे मोहीम देखील सुरू आहेत.

असे पथक अभियंता रोहित इंगळे यांनी सांगितले. सदरील कारवाही उप अभियंता मिलिंद भामरे, पथक अभियंता रोहीत इंगळे, कनिष्ठ अभियंता सचिन वेलदोडे, सुमेर शेख, हेमंत हिवराळे आणि लाईनमॅन बबन सरवदे, राहुल साळवे, योगेश भालेराव , वैभव भटकर, स्वप्निल पाईकडे, तमिज पठाण, मो. शरीफ, सागर डिघोळे, तुषार पोटपिल्लेवार यांनी पार पाडली.

# सिग्माथॉनमध्ये धावले २५०० हून अधिक स्पर्धक



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - केअर सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजी नगरच्या वतीने दि.४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'सिग्माथॉन' या महामॅरेथॉन स्पर्धेमध्ये २५०० हुन अधिक स्पर्धक सहभागी झाले होते सर्व स्पर्धकांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

३, ५ व १० कि.मी या ३ प्रकारांमध्ये सर्व स्पर्धक धावले. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये कॅन्सरवर मात केलेल्या रुग्णांनी सुद्धा प्रत्यक्ष सहभाग नोंदविल्यामुळे आरोग्य विषयक जनजागृतीचा केअर सिग्मा हॉस्पिटलचा प्रयत्न सार्थक झाला.

या स्पर्धेसाठी सर्व स्पर्धक व मान्यवर प्रमुख पाहुणे पहाटे आपला अमूल्य वेळ खर्चून अगत्याने उपस्थित राहिले. प्रमुख पाहुण्यात केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, आ. अंबादास दानवे, माजी महापौर नंदकुमार घोडले, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. मोतीपावळे, राजेश सरकटे, नवनीत कुमार कानवट (डी.सी.पी), डॉ. पारस मंडलेचा, माजी आ.हरिभाऊ बागडे, पोलीस निरीक्षक श्री. केंन्द्रे, श्री.थोरात (ए.सी.पी,ट्रॅफिक) हे उपस्थित होते.

स्पर्धेच्या सुरुवातीला व शेवटी आयोजित करण्यात आलेल्या झुंबा नृत्यामुळे स्पर्धेची शोभा वाढली व सर्व स्पर्धकांनी मनःपूर्वक या स्पर्धेचा आनंद घेतला. या स्पर्धेचे बक्षीस वितरण स्पर्धेची आयोजक डॉ उन्मेष टाकळकर , डॉ अरविंद गायकवाड, डॉ. मनीषा टाकळकर ,श्री मनोज राय, ॉ. प्रफुल्ल जटाळे व संपूर्ण टीम सहभागी होते.

अशा प्रकारचा आरोग्य पूरक कार्यक्रम वेळोवेळी आयोजित करण्याचा संकल्प रुग्णालयाचे चीफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. उन्मेष टाकळकर यांनी यावेळी व्यक्त केला तसेच या स्पर्धेसाठी सरळ हाताने मदत करणाऱ्या सर्व व्यक्तींचे त्यांनी आभार व्यक्त केले. या दिवशीचे औचित्य साधून डॉ उन्मेष टाकळकर याने , कॅन्सर च्या रुग्णांसाठी अजून सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी , बाजूला १०० खाटांचे हॉस्पिटल व अत्याधुनिक सुविधा लवकरच उपलब्ध होतील असे सांगितले. स्पर्धेत ज्यांनी क्रमांक पटकावले त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

# ठेविदारांच्या ठेवी परत करण्यासाठीची प्रक्रिया तत्परतेने राबवा - केंद्रिय राज्यमंत्री डॉ. कराड

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतील ठेविदारांना त्यांच्या ठेवी सुरक्षित परत करण्यासाठी योग्य ती कायदेशीर प्रक्रिया तत्परतेने राबवावी, असे निर्देश केंद्रिय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतील ठेविदारांच्या ठेवी सुरक्षित परत करण्यासंदर्भात डॉ. कराड यांनी आढावा घेतला. यावेळी व्हिडिओ कॉन्फरसिंगव्दारे सहकार आयुक्त अनिल कवडे, अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, पोलिस आयुक्त मनोज लोहिया, पोलिस उपायुक्त अपर्णा गीते, जिल्हा विशेष लेखापरीक्षक सु.प. काकडे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ. मुकेश बारहाते. सहा. आयुक्त (गुन्हे) धनंजय पाटील, उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा प्रभोदय मुळे, जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख डॉ. विजय वीर, प्रशासप समितीचे सदस्य विष्णू रोडगे तसेच अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ.कराड म्हणाले, ठेविदारांना त्यांच्या ठेवी सुरक्षित परत करण्यासाठी एक रकमी कर्ज परतफेड योजना, पतसंस्थेच्या मालमत्तेचा लिलाव तसेच कर्जदाराने कर्ज घेताना पुरेसे तारण दिले किंवा नाही.

याबाबत तपासणी करावी व ठेवी परत करण्याबाबतची प्रक्रिया जलद गतीने राबवावी, लिलाव व या सर्व प्रक्रियेबाबत ठेविदारांना वेळोवेळी माहिती द्यावी, जेणेकरून त्यांना दिलासा मिळू शकेल.

सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी एक रकमी कर्ज परतफेड योजनेबाबत माहिती दिली.

बैठकीच्या प्रारंभी पोलीस अधिकाऱ्यांनी संस्थेतील गैरव्यवहार प्रकरणी होत असलेल्या कारवाईची माहिती दिली. सहकार विभागाने संस्थेचे लेखापरीक्षण, संस्थेच्या कर्जांची माहिती, त्यांची वसुली व सद्यस्थितीत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

